बुधवार २९ जानेवारी २०२५

सज्जन व्यक्ती वाद टाळते. वाद घालणारी व्यक्ती सज्जन असू शकत नाही.

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत      संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक : १३५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# घरकुलच्या लाभार्थ्यांना लुटण्याचा ग्रामसेवकाचा नवा प्रयोग

## एजेंट मार्फत एक फाईल तयार करण्याचे आठशे रुपये | ग्रामसेवक म्हणतो याच एजंट कडून काम करून घ्या

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**सिंदखेड राजा**
**(ज्ञानेश्वर बुधवत) :-** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक नागरिकाला प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजना चालू केली असून

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना स्वतःचे घराचे स्वप्न पूर्ण करता येते परंतु या योजनेला पंचायत समिती मधील ग्रामसेवक आणि त्यांनी नियुक्त केलेल्या दलालांमुळे घरकुल चे स्वप्न रंगवणाऱ्या लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंडाला सामोरे जावे लागत आहे. सिंदखेड राजा पंचायत समिती मध्ये पत्रकार सुरेश हुसे यांच्या नावावर निमगाव या ठिकाणी घरकुल मंजूर झाले आहे. त्या घरकुलाचे करारनामे १०० रुपयाच्या बॉण्डवर करण्यासाठी व संपूर्ण कागदपत्र फाईल भरून देण्यासाठी ग्रामसेवकांनी स्वतः एजंटला भेटण्याचे सांगून त्यांच्याकडून काम करून घ्या असे बजावले. सदर प्रकरण हे घरकुल लाभार्थ्यांचे आर्थिक लुटमारीचे असल्याचे पत्रकारांच्या लक्षात आल्यावर पत्रकार यांनी सदर घटनेची माहिती गटविकास




अधिकारी सिंदखेड राजा आणि ग्रामसेवक यांना दिली बिडिओ पंचायत समिती सिंदखेड राजा यांनी ग्रामसेवक तसेच एजंट यांच्या नावे तक्रार द्या मी कारवाई करतो असे म्हटले आहे. गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना देण्यात आलेल्या तक्रारी मध्ये पत्रकार सुरेश हुसे यांनी असे म्हटले आहे की, घरकुल ची फाईल बनवण्यासाठी ग्रामसेवक संतोष भुतेकर यांनी त्यांचा एजंट प्रवीण खांडेभराड यांच्याकडे मला पाठविले. सदर एजंटची घरकुल फाईल तयार करण्यासाठी माझ्याकडून नगदी ८०० रुपये घेतले आहे. सदर फाईल करण्यासाठी आशा एजंटची आवश्यकता नसतांना फक्त ग्रामसेवकांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी एजेंट ची नेमणूक केली असून त्या एजंट मार्फत घर धारकाकडून प्रतिपाल आठशे रुपये घेऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट सुरू असून संबंधित एजंट व त्याला नियुक्त केलेल्या ग्रामसेवकावर तात्काळ गुन्हा दाखल करावा. असे या निवेदनात म्हटले आहे.

**तक्रार अर्ज हातात येणार नाही, तो पर्यंत कारवाई करता येणार नाही – गटविकास अधिकारी** पत्रकार सुरेश हुसे यांनी केलेल्या घरकुलाच्या फाईल मध्ये त्यांची आर्थिक लूट झाली असून, याची माहिती गटविकास अधिकारी यांना भ्रमणध्वनी वरून दिली असता तुम्ही तक्रार अर्ज दाखल करा मी त्वरित कारवाई करतो. असे गटविकास अधिकारी म्हणाले होते मात्र आता जोपर्यंत तक्रार अर्ज आवक–जावक मधून गटविकास अधिकारी यांच्याकडे येणार नाही तोपर्यंत त्यांना यावर कारवाई करता येणार नाही. असे स्वत: गटविकास अधिकारी हे माध्यमांशी बोलत असताना म्हणाले आहे. जर आठ दिवस अर्ज आवक–जावक मधून गटविकास अधिकारी यांच्या कडे जाण्यासाठी वेळ लागला तर आठ दिवसांमध्ये किती नागरिकांची आर्थिक लूट होईल असा प्रश्न आता सगळ्यांना पडू लागला आहे. व या आर्थिक लुटेला जबाबदार कोण राहील? हा सवाल आता सर्वत्र उपस्थित होत आहे.

# संजय गांधी निराधार योजनेतील २ हजार लाभार्थी अजूनही आधार कार्डशी अनलिंक

## ७ दिवसात कारवाई न केल्यास लाभापासून वंचित

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड बाजीराव गायकवाड**

वारंवार सूचना व माहिती देऊन ही नांदेड शहरातील जवळपास २ हजार लाभार्थी आपले बँक खाते आधार कार्डशी लिंक करू शकले नाही. त्यामुळे पुढील सात दिवसात ही कारवाई न केल्यास या महिन्याचे पैसे खात्यामध्ये जमा होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यासंदर्भात तहसील कार्यालयाने निवेदन स्पष्ट केले असून आधार कार्ड लिंक करण्यासाठी वारंवार शिबिरे घेण्यात आली.मात्र तरीही अनेक जण आधार कार्डला आपले बँक खाते जोडू शकलेले नाहीत. योजनेतील पारदर्शीतेसाठी व प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आधार कार्ड सोबत बँकेचे खाते जोडले जाणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे दोन हजारावर लाभार्थी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



केंद्र व राज्य शासनाच्या योजनेतील विशेष सहाय्य योजनेचे लाभार्थी जसे की गांधी निराधार,विधवा,अपंग, दुर्धर योजना,श्रावणबाळ,इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजना येतात. ६५ वर्षाखालील निराधार लोकांना या योजनेतील लाभ प्रामुख्याने भेटतो. महाराष्ट्र शासन व जिल्हाधिकारी कार्यालय यांनी दिलेल्या निर्देशानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनेमधील पात्र लाभार्थ्यांना बँक/पोस्ट खाते आधार क्रमांकाशी संलग्न केल्यानंतरच अर्थसाहाय्याचे वाटप करण्याबाबत शासन पत्रानुसार कळविण्यात आले आहे.

**शिबीर घेतले तरी दुर्लक्ष**

तहसिल या कार्यालयाने यापूर्वी अनेक वेळा आधार बँक खात्याशी सलंग्न करण्यासाठी कार्यालयात कॅम्प आयोजित केला होता. जाहीर आवाहन महानगरपालिका यांचे ६ क्षेत्रिय कार्यालय तसेच वृत्तपत्राद्वारे व या कार्यालयाचे तलाठ्यांचे कार्यालय येथे प्रसिध्द केलेले होते. मात्र तरीही प्रतिसाद नाही.

**सात दिवसाची मुदत**

मात्र तरीही शिल्लक लाभार्थ्यांनी अदयाप पर्यंत त्यांनी आपले खाते आधारशी संलग्न करून घेतले नसून कार्यालयात संबंधीत कागदपत्रे देखील जमा केलेली नाहीत .सबब पुढील सात दिवसाच्या आत आपले बँक/पोस्ट खाते आधारशी संलग्न करून घेण्यात यावे. तसे न केल्यास आपले अनुदान वितरीत करता येणार नाही याची नोंद घ्यावी. याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यची राहील.

**कागदपत्रेही जमा करावी**

यादीत नमुद लाभार्थ्यांनी आपले बँक खात्याची पहिल्या पानाची पासबुकची झेरॉक्स, अदयावत आधार कार्डची झेरॉक्स, दिव्यांग प्रमाणपत्र, दुर्धर आजार असेल तर त्याबाबतचे प्रमाणपत्र, मोबाईल नंबर इत्यादी संजय गांधी निराधार योजना कार्यालय, नांदेड शहर जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे जाहीर प्रगटनाच्या प्रसिध्दी पासून सात दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत जमा करावे. जे लाभार्थी विहित मुदतीमध्ये आपले वरील प्रमाणे कागदपत्रे जमा करणार नाहीत त्यांचा लाभ त्यांच्या खात्यावर जमा करता येणार नाही. यास लाभार्थी स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**नागरिकांनी सहकार्य करावे**

संजय गांधी व तत्सम योजनेतील लाभार्थी ६५ वर्षांपेक्षा कमी आणि कुटुंबाचे उत्पन्न प्रतिवर्षी रुपये २१,०००/– पर्यंत असणाऱ्या अत्यल्प आर्थिक गटातील बहुतेक निराधार असतात. यामध्ये प्रामुख्याने निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, मोठी आजार, घटस्फोटीत स्त्रिया, दुर्लक्षित महिला, वेश्याव्यवसायातून मुक्त स्त्रिया, अत्याचारी महिला, ट्रान्झेंडर इत्यादी लाभार्थ्यांचा सहभाग असतो त्यामुळे त्यांच्या संपर्कातील नागरिकांनी त्यांना यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे. यासंदर्भात नांदेड ग्रामीणचे तहसील कार्यालय नांदेड येथे व नांदेड शहरचे संजय गांधी योजना नांदेड शहर कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे आधार व बँक पासबुकची झेरॉक्स जमा करावी.अधिक माहितीसाठी तहसील कार्यालय नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार संजय वरकड यांनी केले आहे.

# केरुळ येथे अंभोरा पोलिसांचा छापा दोन गावठी पिस्टल सह आरोपी ताब्यात पळवून आणलेल्या अल्पवयीन मुलीची केली सुटका

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**आष्टी(अण्णासाहेब साबळे)**

आष्टी तालुक्यातील केरुळ येथे अंभोरा पोलिसांनी छापा टाकून दोन गावठी पिस्टल जप्त केले असून आरोपीच्या ताब्यात असलेली अल्पवयीन मुलीची देखील सुटका करण्यात आली.

अधिक माहिती अशी की, अंभोरा पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी केरूळ येथे छापा टाकला असता आरोपी कुमार दत्तू कांबळे रा वरकुटी ता इंदापूर जि पुणे याच्या कडून दोन गावठी पिस्टल व एक पिस्टल राऊंड सह १०२००० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपी कांबळे व



त्याच्या साथीदारांवर आष्टी पोलीस स्टेशन मध्ये गु र क्र ४९/२५ आर्म ॲक्ट कलम ३,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.तसेच आरोपीने १० दिवसांपूर्वी एका अल्पवयीन मुलीला तिच्या गावातून पळवून आणले होते.तिला ताब्यात घेऊन इंदापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.आरोपी कुमार दत्तू कांबळे याच्यावर इंदापूर पोलीस स्टेशन मध्ये बरेच गुन्हे दाखल असल्याचे कळले.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावंत साहेब मा.अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी श्री बाळकृष्ण हानपुढे- पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस स्टेशनचे सपोनि मंगेश साळवे सह / HC/545/बाबासाहेब, PC/794 शिवदास,PC/302/सुदाम,PC / 367/ शरद व आष्टी पोलीस स्टेशन PC/2053/दिपक, PC /1908/ मझरुद्दीन यांनी पार पाडली.



# माझ्या राजकीय प्रवासात सावता परिषदेची मोलाची साथ – ना.अतुल सावे

## नांदेड येथे सावता परिषदेकडुन स्वागत

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड बाजीराव गायकवाड**

सावता परिषद माळी समाजाचे राज्यव्यापी सक्रिय संघटन आहे. माळी समाजात राजकीय आणि शैक्षणिक जागृती साठी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी पुढाकार घेतला आहे.माझ्या राजकीय प्रवासात सावता परिषदेने मोलाची साथ दिल्याचे प्रतिपादन ओबीसी बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांनी व्यक्त केले. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण ना.अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले. नांदेड नगरीत आगमन झाल्यानंतर सावता परिषदेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.याप्रसंगी भावना व्यक्त करतांना ना.अतुल सावे म्हणाले की,सावता परिषद ही लढवय्ये संघटना आहे.माळी समाजाच्या प्रश्नांना आवाज उठविण्याचे काम सातत्याने या संघटनेच्या माध्यमातून होत आहे.माझ्या राजकीय प्रवासात सावता परिषदेने खंबीर साथ दिली असल्याचे प्रतिपादन ना.सावे यांनी केले. स्वागतप्रसंगी नांदेड जिल्हाध्यक्ष गोरखनाथ राऊत , जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिंदे , जिल्हा सरचिटणीस संदीप राऊत, जिल्हा प्रवक्ते मारोती शीतळे , युवा जिल्हाध्यक्ष श्रीकांत राऊत, सोशल मीडिया जिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर गोरे, युवा महानगराध्यक्ष संदीप झांबरे, महानगर सरचिटणीस कैलास शिंदे ,अर्धापूर तालुकाध्यक्ष लवराज माटे, माळी समाज बांधव, विविध संघटनेचे पदाधिकारी मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते.

# पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा मंजूर लाभार्थ्यांनी कागदपत्राची पूर्तता करून लाभ घ्यावा–आ.सुरेश धस

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**आष्टी(अण्णासाहेब साबळे)**

आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना–ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत ११ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत.गावनिहाय ग्रामपंचायत समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.पंतप्रधान घरकुल योजना–ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता



वितरणाचे काम हाती घेतले.प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी ६१५७,पाटोदा २९०२,शिरूर कासार २८०५ तिनी तालुक्यात घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे दोन दिवसात करावी. तात्काळ पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये अनुदान जमा केले जाणार आहे.घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा कराव्यात म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा जाणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले आहे.

# महापौर निवडणूक; स्वतंत्र निरीक्षक

**लोकनेता न्युज नेटवर्क** नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश (निवृत्त) जयश्री ठाकूर यांची ३० जानेवारी रोजी होणाऱ्या चंडीगड महापौर निवडणुकीसाठी स्वतंत्र निरीक्षक म्हणून नियुक्ती केली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन कोतीश्वर सिंग यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले. न्यायालयाने निवडणुकीची कार्यवाही निरीक्षकांच्या उपस्थितीत करण्याचे निर्देश दिले. तसेच त्याचा व्हिडीओ काढण्याचे आदेशही दिले. न्यायालयाला अधिकाऱ्यांच्या

निष्पक्षपातीपणा आणि स्वातंत्र्यावर शंका नाही. मात्र, याचिकाकर्त्याने व्यक्त केलेली भीती लक्षात घेऊन स्वतंत्र निरीक्षक नेमण्याचा प्रस्ताव होता, असे कोर्टाने म्हटले.

# कोरेगावात महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आचल मनोज आगरवाल या महिला खेळाडूच्या हस्ते ध्वजवंदन !

## सरपंच संदीप ढेरंगेंनी स्वत:चा ध्वजारोहणाचा मान दिला खेळाडूंना.

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**हवेली (संतोष कदम)**

एकीकडे ध्वजारोहणाचा मान-पानावरून गावोगावी राजकारण चालू असताना कोरेगाव भीमा (ता. शिरूर )येथील ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप ढेरंगे यांनी मात्र प्रजासत्ताक दिनी स्वत:चा ध्वजवंदनाचा मान महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल या गावातीलच गुणी खेळाडूंना देत समाजासमोर आदर्श घालून दिला आहे. कोरेगाव भीमा येथे ध्वजारोहण प्रसंगी



गुणवंतांचा गुणगौरव व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आले होते. यावेळी त्यानंतर अण्णासाहेब मगर बँकेचे संचालक राजाराम ढेरंगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्कार सोहळयाला ग्रामपंचायतीच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात १८४ गुणवंत विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व गावातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंताचा सत्कार ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आला. यावेळी सरपंच संदीप ढेरंगे, उपसरपंच सविता घावटे, ग्रामपंचायत सदस्य अमोल गव्हाणे, केशव फडतरे, महेश ढेरंगे, गणेश कांबळे शरद ढेरंगे, अनिकेत गव्हाणे, वंदना गव्हाणे, मनीषा गव्हाणे, जयश्री गव्हाणे, कोमल खलसे, शिल्पा फडतरे, ग्राम पंचायत अधिकारी श्रीकांत वाव्हळ यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्याप्रमाणात उपस्थित होते. या प्रसंगी गुणवंताचा फेटा, गुलाबपुष्प व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करताना हा आपल्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा क्षण असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. तर यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमातही देशभक्ती गीतापासून आपली कला संस्कृती, परंपरा, ऐतिहासिक वारसा यांचे दर्शन घडले.

माजी सरपंच विजय गव्हाणे यांनी प्रास्ताविक केले, तर ग्रामपंचायत सदस्य महेश ढेरंगे व श्री.सातपुते सर यांनी सूत्रसंचालन केले.

**सरपंच संदीप ढेरंगेंनी स्वत:चा ध्वजारोहणाचा मान दुसऱ्यांना देणे अभिमानास्पद तुमचे क्षेत्र कोणतेही असो समर्पण, मेहनत व जिद्दीच्या जोरावर यश नक्कीच मिळते. एकीकडे ध्वजारोहणाच्या मानपानावरून राजकारण चालू असताना गावच्यावतीने सरपंच संदीप ढेरंगे यांनी स्वत:चा ध्वजारोहणाचा मान मला देत समाजासमोर आदर्श निर्माण करत हा क्षण आम्हा खेळाडूंच्या दृष्टीने अभिमानाचा असल्याचे महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल यांनी सांगितले.**

**जय महाराष्ट्र मंडळाने जपली सामाजिक बांधिलकी गावातील गांधी चौकातील जय महाराष्ट्र तरुण मंडळाच्या वतीने आर्चरी प्रकारात नॅशनल चॅम्पियन असलेले गावातील तुषार संजय फडतरे यांच्यासह दिव्या संपत गव्हाणे व महिला क्रिकेटच्या महाराष्ट्राच्या अध्यक्ष आँचल मनोज आगरवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे.**

## हिंदू खाटीक समाजाच्या वतीने भिगवण मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**जय मल्हार तरुण मंडळाचा स्तुत्य उपक्रम**
**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**इंदापूर:(बबनराव धायतोंडे)**

:- जय मल्हार तरुण मंडळ व हिंदू खाटीक समाज भिगवण (ता.इंदापूर) यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार समारंभ आयोजित करून समाजापुढे एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.

७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.हिंदू खाटीक समाज संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन भैय्या खडके, राजेंद्र जमदाडे भाजपा भिगवण शहराध्यक्ष,गणेश कांबळे,बंडू ताडे,प्रशांत कांबळे आणि मंडळातील इतर कार्यकर्ते या सर्वांच्या सहकार्यातून गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी आणि त्यांनी मिळवलेलं यश हेच या सत्कार सोहळ्याचे प्रमुख आकर्षण होते.

सत्कार सोहळ्याचे प्रमुख सत्कारमूर्ती

महाराष्ट्र राज्यसेवा आयोगातून मुलींमध्ये प्रथम क्रमांक कु.मनीषा संगीता शिवाजी गुंजाळ,अन्नसुरक्षा अधिकारी,

डॉ.गौरी महेश ताडे,बालरोग तज्ञ,

डॉ.साक्षी सुनील शेला,,

चिरंजीव मोहित महेंद्र शेठ भोगावत ,

तसेच क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश मिळवून भिगवण गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे,तरुण युवा खेळाडू

पै.राज युवराज गायकवाड,पै.यशराज वायसे,पै.शाहिद मुलाणी,पै.अजय कोतमिरे या सर्वांचा जय मल्हार तरुण मंडळ व हिंदू समाज खाटीक समाज संघटना यांच्याकडून सन्माचिंन्ह देऊन सत्कार करण्यात आले.

यावेळी लालासाहेब धवडे,सचिनशेठ बोगावत संस्थापक रोटरी क्लब भिगवण, राष्ट्रवादी कॉंग्रेस च्या इंदापूर तालुका उपाध्यक्ष सौ.सीमाताई काळंगे,कमलेश गांधी,हृदय फाउंडेशनच्या संस्थापक सौ. मेघाताई शेलार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सचिन बोगावत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जय मल्हार तरुण मंडळाचे कौतुक करत आभार मानले. आणि गुणवंतांचा सत्कार करून आपण त्यांचं जे मनोबल वाढवण्याचं कार्य करत आहात त्याबद्दल सर्व मान्यवरांचेही आभार मानले.

तसेच सौ.सीमाताई काळंगे यांनी गुणवंतांचे कौतुक करताना त्यांच्या पालकांचेही कौतुक करत मुलांच्या यशांमध्ये आपलाही सहभाग लाखमोलाचा आहे.असे सांगून पालकांचेही आभार मानले.तसेच क्रीडा क्षेत्रातही विशेषत:कुस्ती स्पर्धेत यश मिळवलेल्या गुणवंत खेळाडूंचेही कौतुक करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

उपस्थित सर्वच मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना सर्व गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचे कौतुक करत आयोजकांचेही आभार मानले.असेच समाज उपयोगी उपक्रम आपण राबवावेत आणि सामाजिक बांधिलकी जपावी अशी भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.

## हिंगोली जिल्ह्याचा अपमान सहन करून घेणार नाही शेतकरी नेते मारोती गीते

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**सेनगाव ( महादेव हरण):-**

माझ्या जिल्ह्याचा अपमान सहन करून घेणार नाही शेतकरी नेते मारोती गिते दिनांक २६ जानेवारी राष्ट्रीय उत्सव प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री सन्माननीय श्री नरहरी झिरवाळ यांनी हिंगोली जिल्हा हा गरिबाचा जिल्हा म्हणून एक प्रकारे जिल्ह्याचा अपमान केला आहे त्यांना हिंगोली जिल्ह्याबद्दल माहिती कमी असल्याचा अभाव दिसून येतो व कर्म कुशल तेवर त्यांचा विश्वास नसल्यासारखे वक्तव्य आहे आणि हे वक्तव्य माझ्या जिल्ह्याला अपमानित करणारे असल्यामुळे मी या वक्तव्याचा जाहीर निषेध करतो कारण हा जिल्हा संतांची भूमी आहे भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन संपूर्ण भारतभर हिंदू धर्माची मेड रवणारे श्री संत



शिरोमणी नामदेव महाराजांचा जन्मस्थळ हाच जिल्हा आहे आदरणीय भारतरत्न नानाजी देशमुखांचा जिल्हा आहे याच जिल्ह्यामध्ये बारा ज्योतिर्लिंगापैकी आठवे ज्योतिर्लिंग नागेश्वर औंढा याच जिल्ह्यामध्ये आहे आणि कष्टकरी इमानदार शेतकऱ्यांचा हाच जिल्हा आहे आणि या जिल्ह्यावर आतापर्यंतच्या राजकारण्यांनी या जिल्ह्यावर वेळोवेळी अन्याय केला आहे या जिल्ह्यामध्ये तीन-तीन धरणे आहेत मात्र या धरणाच्या पाण्याचा अधिकार येथील शेतकऱ्यांना नाही यामध्ये येलदरी धरण सिद्धेश्वर धरण ईसापुर धरण हे सर्व धरणे हिंगोली जिल्ह्यांमध्ये आहेत आणि या धरणाचं पाणी पर जिल्ह्यामध्ये नांदेड मध्ये जाते मात्र डावा कालवा काढून यांचं पाणी येथील शेतकऱ्यांना दिले नाही म्हणूनच हा जिल्हा आर्थिक दृष्ट्या मांगे ठेवण्याचं काम यापूर्वीच्या सरकारनेच करून येथील शेतकरी सर्वसामान्य जनतेवर अन्याय करून आर्थिक जखम केली आणि त्या आर्थिक जखमेवर मीठ चोळण्याचे काम दिनांक २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय उत्सवालाच जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी मीठ चोळण्याचे काम केलं आणि दिल्याबद्दल हा गरीब जिल्हा म्हणून हिनवण्याचे वक्तव्य केले आणि या वक्तव्याचा आम्ही सर्व हिंगोली जिल्हा वाशी या वक्तव्यांचा जाहीर निषेध करतो हिंगोली जिल्ह्याचा अपमान म्हणजेच संताचा अपमान येथील शेतकऱ्यांचा अपमान तीर्थक्षेत्राचा अपमान येथील कष्ट करिता अपमान आणि हा अपमान आम्ही सहन करून घेणार नाही आणि या अपमानाचा बदला जिल्ह्याला आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवुनच घेऊ शेतकरी नेते मारोती गिते

## अल्पवयीन मुलानी नववीतील अल्पवयीन मुलाला दिली अल्पवयीन विद्यार्थिनीची सुपारी

## मुख्याध्यापकासह तिघांवर गुन्हा दाखल !

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**दौंड (बबनराव धायतोंडे)**

हे घे शंभर...तिच्यावर रेप कर अन् तिला मारून टाक,अल्पवयीन पोरांनी नववीतील अल्पवयीन पोरालाच दिली अल्पवयीन विद्यार्थिनीची सुपारी ; मुख्याध्यापकासह तिघांवर गुन्हा दाखल ! दौंड मध्ये नेमक काय घडलं? याचीच सविस्तर माहिती अशी की बातमी आहे पुण्याच्या दौंड मधून विद्यार्थ्याने पालकांची खोटी स्वाक्षरी केल्याच शिक्षकांना सांगितल्याचा राग मनात धरून संबंधित विद्यार्थ्याने अल्पवयीन विद्यार्थिनीवर आधी बलात्कार करावा आणि नंतर तिचा खून करावा,यासाठी चक्क १०० रुपयांची सुपारी त्याच शाळेत दुसऱ्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्याला दिल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे.







बुधवारी २२ जानेवारी रोजी दौंड येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हा खळबळ जनक प्रकार घडला.मात्र,आपल्या शाळेची बदनामी होऊ नये म्हणून तो प्रकार दडपण्याचा प्रयत्न केला गेला.ङ्गपरंतु विद्यार्थिनींने घडलेला प्रकार घरी पालकांना सांगितल्यानंतर पालकांच्या फिर्यादीवरून दौंड पोलीस ठाण्यात मुख्याध्यापकासह वर्गशिक्षक व शिक्षिका,अशा तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली आहे. दौड शहरातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हा सर्व प्रकार घडला आहे. वर्गातील एका विद्यार्थ्याने पालकांची खोटी स्वाक्षरी केली होती. ती सही त्याच वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने पाहिली होती.याची माहिती तिने वर्गशिक्षिकेला दिली.याचा राग संबंधित विद्यार्थ्यांने मनात धरला होता.संबंधित विद्यार्थी व त्याच्या मित्राने इयत्ता नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला संबंधित विद्यार्थिनीवर अगोदर बलात्कार कर आणि नंतर तिला मारून टाक यासाठी १०० रुपयांची सुपारी दिली. ज्या विद्यार्थ्याला याबाबतची सुपारी दिली त्या विद्यार्थ्याने ही सर्व घटना त्या विद्यार्थिनीला येऊन सांगितली.त्यानंतर या विद्यार्थिनीने तिच्या घरी याची माहिती दिली.या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या वडिलांनी वर्गशिक्षक, सुपर वायझरसह मुख्याध्यापकांकडे याबाबत विचारणा केली मात्र त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही.त्यानंतर संबंधित अल्पवयीन विद्यार्थिनीसह तिच्या पालकांनी दौंड पोलीस ठाणे गाठले. यानंतर संबंधित अल्पवयीन विद्यार्थिनीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून मानसिक त्रास देत तिचे शैक्षणिक नुकसान केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

## पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी जिल्हा नियोजन समितीची बैठक

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड बाजीराव गायकवाड**

राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरूवार ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० वा. कै. डॉ. शंकरराव चव्हाण, नियोजन भवन मुख्य सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीची




संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन अभिजित राऊत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती नांदेड यांनी केले आहे.

# पंचशील विद्यालय लखमापूर येथे मोठ्या उत्साहात सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न.

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**माहूर :** राजकिरण देशमुख

तालुक्यातील लखमापूर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त पंचशील विद्यालय माध्यमिक शाळामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सुरुवात करण्यात आली माहूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पालसिंग ब्राह्मण हे विचार मंचावार कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून लखमापूरचे सरपंच गणेश राठोडतर मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशजी गायकवाड यांचा हस्ते पोलीस उपनिरीक्षक पालसिंग ब्राह्मण यांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला या ठिकाणी सर्व मान्यवरांचा शाळेचे प्राचार्य अमोल गायकवाड सर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला ङ्ग विचार मंचावर बोलताना बालसिंग ब्राह्मण यांनी त्यांच्या शैक्षणिक जीवनाबद्दल सांगत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले या कार्यक्रमात महागाव तालुक्याचे वन परिक्षेत्र अधिकारी देवेंद्रजी मुनेश्वर यांनी आपले मनोगत विद्यार्थ्यांसमोर मांडले कार्यक्रमाला वंदन गीत गाऊन चिमुकल्याने कार्यक्रमाची सुरुवात केली मंचावार, बंजारा नृत्य आदिवासी नृत्य,करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक रवींद्र गायकवाड यांनी संचलन तर शाळेतील कर्मचऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न केले शाळेच्या वतीने शाळेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांनी मान्यवराचे आभार मानले कार्यक्रमांस उपस्थित संतोष राठोड,दिगंबर जगताप सर,कुमार कांबळे, विनोद शेंडे, मारोती कांबळे, सुभाष भवरे,पत्रकार सिद्धार्थ तामगाडगे,राजकिरण देशमुख,ऍड विशाल भवरे,डॉ.सत्यम गायकवाड उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचशील विद्यालय लखमापूर येथील शिक्षक श्री. पेटकुले सर,नगराळे सर,आडे सर, टेकाम सर,कांबळे मॅडम,भावना भगत मॅडम,वंजारे मॅडम,मुनेश्वर,शेंडे,पाटील,वल्हेवाड, भगत यांनी परिश्रम घेतले.



## कै.गोविंदराव पाटील विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**माहूर : प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील वझरा (शे.फ.) येथील कै. गोविंदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एस. फड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.त्यानंतर संस्थेचे सचिव बालाजी पांडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीतीत शाळेतील विद्यार्थ्यांच्या कवायती, शालेय क्रीडा स्पर्धा, बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी गावाचे सरपंच दीपक केंद्रे, उपसरपंच पुष्पा रनमले, ग्रा. पं. सदस्य अंकुश बहिरमकर, संतोष केंद्रे, आरोग्य सेवक ऐकाळे, आरोग्य सेविका जगदाळे सय्यद इसा विठ्ठल शेंडे, प्रभू चोले, शिवसांब मुंडे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.यावेळी विद्यालयाचे विद्यार्थी नगमा सय्यद, श्रद्धा फड, रविना राठोड, समीक्षा जगदाळे, माधवी ठाकरे, आदीनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस. आर. नागरगोजे यानी तर आभार पी. एम.मुनेश्वर यांनी मानले. यावेळी शिक्षक साईनाथ नागरगोजे, एस. बी. गळेगावे, एस. एन. पाटील, सुनील फड, एस. जी.पांडागळे,एस. एस. वाघमारे, आर. एम. भिसे, जी. एम.श्रीरामे, एस. बी. जमदाडे, एच एस. राघू, जी. पी. कपाळे, डी. एस. तेलंगे एस. पी. जमदाडे यांचेसह शाळेचे कर्मचारी,गांवकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आनंदनगरीतून घेतले विद्यार्थ्यांनी आर्थिक व्यवहाराचे धडे – हाळदा केंद्रीय शाळेत भरला आनंद मेळावा.



**दै . लोकनेता न्युज नेटवर्क**
**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर :– हाळदा केंद्रीय शाळेतील विद्यार्थ्यांनी दिनांक २७ जानेवारी रोजी आनंदनगरी च्या माध्यमातून आर्थिक व्यवहाराचे ज्ञान घेऊन खरी कमाई केली.तशेच आणलेल्या अनेक रुचकर खाद्यपदार्थांचा सर्वांना घ्यायला लावला आस्वाद.ङ्ग जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा हाळदा येथील शाळेतील विद्यार्थ्यांनी आनंदनगरी भरवून अनेक रुचकर खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. या आनंदनगरी मेळाव्याचे उद्घाटन गावातील माजी सरपंच तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी नार्लेवाड,शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विलास अक्कलवाड,चेअरमन दत्तराव अक्कलवाड,विलास किसवे, मु.अ. न्यालमवार सर आदींच्या हस्ते करण्यात आले.आनंदनगरीत बालकांनी समोसे, पावभाजी,खव्याचा पेढा, गुलाब जामुन, बर्फी,बासुंदी,चकल्या,मिरची भजे,चिवडा, पापडे,आदी अनेक रुचकर पदार्थ घरून बनवून आणली होती. या सर्व खाद्यपदार्थांचा गावातील नागरिकांनी व महिलांनी तसेच शिक्षक वृंदानेही मन मुराद आनंद घेतला.यातून या बालकांना आर्थिक व्यवहाराचे ज्ञानही मिळाले व त्यांनी मोठ्या प्रमाणात खऱ्या कमाईचा आनंद चाखला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य दत्ता मुडसे,माधव रेकडपले,गजानन आरलवाड गोविंद पन्नासवाड,संभाजी आरलवाड आदीसह अनेकांची उपस्थिती होती. या आनंदनगरी आनंद मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक राजू व्यवहारे,श्रीमती मंडलापुरे,श्रीमती तिगोटे, श्रीमती सावंत,श्रीमती मिटकरी आदीसह अनेकांनी मोलाचे योगदान दिले.



## बसच्या दरवाढीच्या विरोधात शिवसेना उबाठा शिवसैनिकांचे चक्का जाम आंदोलन

लोकनेता न्युज नेटवर्क मुदखेड किशोर मुंगल

मुदखेड येथे शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने मा.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने सरकारने केलेल्या एस.टी भाडे दरवाडीच्या निषेधार्थ श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे चक्का जाम आंदोलन करण्यात आले यावेळी शिवसेना ता.प्रमुख पिंटू पा.वासरीकर,भोकर विधानसभा प्रमुख विश्वंभर पवार, युवा सेना तालुका प्रमुख शिवाजी पाटील गाढे, शिवसेना शहर प्रमुख सचिन चंद्रे, अविनाश झमाकडे,अंकुश मामिडवार, ता.संघटक माधव पावडे, मा.नगर सेवक बाळु चंद्रे,साहेबराव चव्हाण,उप.ता प्रमुख संजय गाढे,विलास पा.कळणे,आनंदराव जाधव ता.समन्वयक,अभय बल्लमखाणे,नदू वलदे,राजन वड्डे,संजय गिरी, केशव शिंदे,साहेबराव कांजाळकर,दिपक इंगोले,संभाजी गाढे,सदानंद खानडरे,गोपीनाथ मुंगल आदी शिवसैनिक उपस्थित होते

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियाना अंतर्गत बक्षीस वितरणाचे वाटप





**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नायगाव माधव बैलकवाड**

येथील शरदचंद्र कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला .महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने विविध उपक्रमा अंतर्गत निबंध लेखन, ग्रंथ प्रदर्शन , सामूहिक वाचन व ग्रंथ परीक्षण अशा विविध उपक्रमाव्दारे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . विद्यार्थ्यांना वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी म्हणून मोठ्या प्रमाणात ग्रंथ परीक्षण ही स्पर्धा घेण्यात आली होती .या स्पर्धेत विद्यार्थ्यांना आवडेल ते पुस्तक घेऊन ग्रंथ परीक्षण करण्याची स्पर्धा घेण्यात आली यावेळी वाचकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद व सहभाग नोंदवला .यामध्ये शितल लालू जोडवाड हिने प्रथम क्रमांक मिळवला ,सिद्दिकी शिफा सिद्धकी नसीर हिने द्वितीय तर वैष्णवी माधव टाकळे या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक मिळवला .या सर्वांना प्रमाणपत्र व भारतीय संविधानाचा ग्रंथ पारितोषिक रूपाने देण्यात आला . या विजेत्यांचा सत्कार नांदेड जिल्ह्याचे खासदार तथा संस्थेचे सचिव मा.प्रा.रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.हरीबाबू ,उपप्राचार्य डॉ.एस.एस.पाटील व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक ,प्रशासकीय कर्मचारी यांची उपस्थिती होती.तर वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.भरत आर.लोकलवार यांनी विशेष परिश्रम घेतले .या बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रो.डॉ.बलभीम जे. वाघमारे यांनी केले .या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

## दुःखद वार्ता सिद्धार्थ रोडे सर यांना मातृशोक

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**बीड प्रतिनिधी :–**कालवश कुसुमताई विश्वनाथ रोडे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे .त्या सिध्दार्थ रोडे सर यांच्या आई,व तसेच रि.पा. ई.चे राज्य सचिव भास्कर नाना रोडे व प्रा.डॉ.माधव रोडे सर यांच्या चुलती होत्या. तसेच मुले,सून,नातवंडे, अशा मोठा परिवार असून यांच्या अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी ऊद्या दि.२९/१/२०२५ बुधवार रोजी सकाळी ०९–०० वाजता कन्हेरवाडी येथील शमशान भूमी येथे करण्यात येणार आहे.



# संत गंगागीर महाराज पुण्यतिथीनिमित्त कोकलेगाव राजगडनगर येथील यात्रा संपन्न

### गंगागीर महाराजांच्या समाधी स्थळाचे खा. रवींद्र चव्हाण यांनी घेतले दर्शन

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नायगाव माधव बैलकवाड**

नायगाव तालुक्यातील मौजे कोकलेगाव राजगडनगर येथील गावचे ग्रामदैवत श्री संत सद्गुरु गंगागीर महाराज यांच्या ८४ व्या पुण्यतिथीनिमित्त दोन्हीही गावच्या वतीने अभिषेक,भजन,

आरती,कीर्तन कार्यक्रम व महाप्रसादाचे आयोजन समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते या यात्रेमध्ये संपूर्ण गावकरी यांनी तन–मन धनाने यात्रा भरवली कोकलेगाव व राजगडनगर यासह परिसरातील भाविकांनी या यात्रेचा मनमुरादपणे आनंद लुटला आहे,ही यात्रा उत्साहात साजरी झाली.



यात्रेमधील काल्याच्या कीर्तनात भागवताचार्य ह भ प बाबू महाराज गिरगावकर यांची कीर्तन रुपी सेवा झाली असून या कीर्तनरुपी सेवेला गायक विष्णुदास महाराज तांदळीकर अंकुश महाराज कौशल्ये,जीवन रत्नाळीकर तर मृदंग वादक विश्वेश्वर महाराज कोलंबीकर विशाल महाराज बावळगावकर प्रदीप महाराज चव्हाण यासह यादव पाटील डाखोरे, हरी महाराज वाघे, देविदास देशमुख, या कलावंताची संगीत साथ लाभली. आपले जीवन साफल्य होण्यासाठी मोठ्या प्रमाणात जमलेल्या भाविकांनी मन तृप्त होऊन कीर्तनातील अनमोल विचाराने आपले कान तृप्त केले, श्री संत गंगागीर महाराजांच्या समाधी स्थळाचे खासदार रवींद्र वसंतराव पाटील चव्हाण यासह शिवराज पाटील होटाळकर, रुपेश देशमुख कुंटूरकर, सूर्याजी पाटील चाडकर या मान्यवरांनी दर्शन घेतले तर गाव कमिटीतील शंकर पाटील जुने, प्रवीण पाटील नारे, नायगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती गजानन पाटील जुने, हनुमंत पाटील मिरकुटे, श्रीपतराव पाटील मोरे, ज्ञानेश्वर पाटील मोरे, बापूराव व्यंकटराव पाटील मोरे, माधवराव पाटील मिरकुटे, हनुमंत गाजलवाड,तानाजी देशमुख,नितीन हुगे,लव्हाजी पाटील नारे यांच्या वतीने मान्यवरांचा आपल्या गावकऱ्यातर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी श्याम पाटील चोंडे, प्रसिद्ध सावकार व उद्योजक पवन गादेवार, मनोज सावकार, व्यंकटराव पांडे, पिराजी पाटील शहापूरे, मल्लिकार्जुन मठपती, दत्तात्रय शिंदे यासह गावातील हनुमंत पाटील मिरकुटे, बालाजीराव नारे, गंगाधर हंगरंगे, यादव पाटील नारे, चेअरमन भीमराव पाटील नारे, ज्ञानेश्वर पांचाळ, दत्ता मारुती शिंदे, पद्माकर पदमवार यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## फिरत्या वाहनावरील दुकानासाठी दिव्यांगांना अर्ज करण्याची संधी

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड बाजीराव गायकवाड**

हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकानासाठी दिव्यांग व्यक्तींकडून ऑनलाईन अर्ज गुरुवार ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत मागविण्यात आली आहेत. या अर्जासाठी https://register.mshfdc.co.in ही लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या लिंकद्वारे दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. दिव्यांग व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी–सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीला चालना मिळावी. दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन व्हावे. सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार, कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे हा आहे. सन २०२४–२५ साठी दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई–व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याची योजना लागु करण्यासाठी शासन निर्णय १० जून २०१९ नुसार मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या. यांच्यास्तरावरुन सुरू आहे. राज्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्जदाराची नाव नोंदणी (अर्ज करण्यासाठी) पोर्टल २२ जानेवारी २०२५ रोजी प्रक्षेपित करण्यात आले आहे.

## विश्वेश्वर महादेव मंदिरात अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा

**लोकनेता न्यूज नेटवर्क बिलोली गौतम गावंडे**

अंजनी ता बिलोली जि नांदेड येथील विश्वेश्वर महादेव मंदिरात अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. हा धार्मिक सोहळा दिनांक २४ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.ह्व ङ्गया सप्ताहाच्या निमित्ताने विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात ग्रंथराज परमरहस्य पारायण, शिवमहिमा कीर्तन, भजन, प्रवचन तसेच रुद्राभिषेक आणि महाप्रसाद असे विविध उपक्रम होणार आहेत. स्थानिक भाविकांसह परिसरातील श्रद्धाळूंनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.ङ्गसोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे अखंड शिवनामाचा जप, जो ७ दिवसांपर्यंत अखंड चालणार आहे. या जपातून सकारात्मक ऊर्जा निर्माण करून श्रद्धाळूंना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळणार आहे. तसेच, ग्रंथराज परमरहस्य या पवित्र ग्रंथाचे पारायण साक्षात अनुभवी विद्वानांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे, जे अध्यात्माच्या गूढ रहस्यांवर प्रकाश टाकणार आहे. कार्यक्रमाचा समारोप सद्गुरू विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेड यांचे आशीर्वचनाने समाप्त होईल व महाआरती झाल्यानंतर महाप्रसाद होणार असून, दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी ठीक १२:०० सर्व भाविकांसाठी महाआरती व प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन विश्वेश्वर महादेव मंदिर आयोजन समिती व गावकरी मंडळी अंजनी समितीने केले आहे.

## कासराळी येथील आरोग्य उपकेंद्राचे एक दिवस अधिच काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केले उद्घाटन



**राज्य सभेचे सदस्य डॉ अजित गोपछडे करणार होते लोकार्पण**

**लोकनेता न्यूज नेटवर्क बिलोली गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे कासराळी येथील आरोग्य केंद्राचे उद्घाटन काँग्रेसचे बिलोली तालुकाध्यक्ष शिवाजी पाटील पाचपिपळीकर यांनी केली आहे.ङ्गदि २७ रोजी राज्य सभेचे सदस्य डॉ.अजित गोपछडे यांच्या दौऱ्यात कासराळी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे लोकार्पण सोहळ्याचे (दौरा)वेळापत्रक सोशल मीडिया वर वायरल करण्यात आले पण काँग्रेस च्या खासदारांना बोलवले नसल्याने काँग्रेस पदाधिकारी संतापले व लोकार्पण सोहळा एक दिवस अगोदरच उरकून टाकले सविस्तर वृत्त अशी की ङ्गमानव विकास कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्रा साठी च्या जागा शहानिशा करण्यासाठी २० मार्च २०२० रोजी जिल्हा नियोजन अधिकारी यांनी पत्रव्यवहार केला त्या अनुषंगाने जागेचा पाठपुरावा तत्कालीन सरपंचानी केला होता.

तत्कालीन शिक्षण व आरोग्य सभापती संजय बेळगे यांनी ७५ लक्ष रुपये निधी दिला होता. ईमारतीचे बांधकाम ६ महिन्या पुर्वी पुर्ण झाले विद्यमान काँग्रेस चे खासदार रविंद्र चव्हाण व तत्कालीन शिक्षण व आरोग्य सभापती संजय बेळगे यांना निमंत्रन दिले नाही .म्हणून चक्क काँग्रेस पदाधिकारी यांनी उद्घाटन करुन टाकले व त्याच्या फोटो सोशल मीडिया वर टाकण्यात आले. यावेळी शंकर यंकम ,शिवानंद पाटील सोमासे राजेश चरकुलवार ,दिलीप पाटील पांढरे ,पांडुरंग पा, रामपुरे ,दीपकराव संदलोड ,वलीओद्दीन फारुखी, सायराम निदाणे ,मारोती भुरे ,उत्तमराव एज्युलकंटे ,रामचंदर गांगुलवार ,किरण चरकुलवार मधुकर सोमासे पाटील,गजानन कोटपालवड सह अनेक जन उपस्थित होते

## प्रशांत लोखंडे यांचा गौरव!

**लोकनेता न्यूज नेटवर्क भोकरदन/राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील पारध येथील जालना गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार प्रशांत शिवाजी लोखंडे यांनी दिलेल्या



उलेखनीय योगदानाबद्दल प्रजास्ताकदिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.प्रशांत शिवाजी लोखंडे यांनी जालना स्थानिक गुन्हे शाखेत असताना जिल्ह्यातील गर्भलिंग निदान व अवैध गर्भपात संदर्भात केलेले काम उलेखनीय व प्रेरणादायी असल्याबद्दल पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी मठा परतूर चे आमदार बबनराव लोणीकर, बदनापूर चे आमदार नारायण कुचे, भोकरदन चे आमदार संतोष पाटील दानवे उपस्थित होते.या यशाबद्दल पारध येथील गावकऱ्यांच्या वतीने व सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## स्वातंत्र्यसेनानी डॉ.दासराव साकळकर यांचा इतिहास येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील- खा.अशोक चव्हाण

**दै . लोकनेता न्युज नेटवर्क**

**भोकर । रमाकांत जोशी**




महान स्वातंत्र्य सेनानी डॉ.दासराव साकळकर यांचा उज्वल व ज्वलंत इतिहास सदोदित येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील असे विचार खासदार अशोक चव्हाण यांनी बोलताना व्यक्त केले.ते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरचे स्वातंत्र्यसेनानी डॉ. दासराव साकळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकर जि.नांदेड नामांतर सोहळ्यात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्रीजयाताई चव्हाण,बालाजी कंठेवाड,सुदाम पाटील, गोविंद उल्लेवाड,भगवानराव दंडवे,नामदेव आयलवाड,विनोद पाटील चिंचाळकर, दिलीपराव देशमुख आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाने भोकरच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस एका महान स्वातंत्र्य सेनानी चे नाव देऊन त्यांचा गौरव केला आहे. त्यामुळे मी सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो व आभार मानतो.डॉ.दासराव साकळकर यांचे जीवन म्हणजे एक धगधगती मशाल आहे. त्यांनी त्यांच्या जीवनात अनेक कठीण प्रसंगाला सामोरे जावून निजाम शासनाशी दोन हात केले.कोरड्याची शिक्षा भोगली,जेल भोगली परंतु हार पत्करली नाही.त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा आनंद उपभोगत आहोत.मराठवाडा मुक्ती संग्रामात त्यांनी दिलेले योगदान कधीच मराठवाडा विसरू शकणार नाही. त्यांचे या संस्थेला दिलेले नामकरण सदैव प्रेरणादायी राहील असे सांगितले. तसेच या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भव्य अशी नवीन इमारत मिळाल्यामुळे तालुक्यातील अनेक विद्यार्थी उद्योगाचे प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी होतील असा आत्मविश्वास व्यक्त केला.या कार्यक्रमात आमदार श्रीजयाताई चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त करून स्वातंत्र्य सेनानी डॉ.दासराव साकळकर यांच्या प्रेरणादायी जीवनाला नमस्कार केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य विश्वंभर कंदलवाड यांनी केले तर आभार साकळकर परिवाराच्या वतीने मान्यता आले. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन प्राध्यापिका मीरा जोशी यांनी केले.यावेळी शहरातील व तालुक्यातील अनेक मान्यवरासह साकळकर परिवाराची मुंकुद साकळकर मिलिंद साकळकर रामकृष्ण साकळकर श्रीमती विद्या कौंडण्य श्रीमती उज्वला करमरकर देविदास साकळकर अनंत साकळकर तसेच शहरातील प्रतिष्ठीत नागरीक मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पाळज येथे संकल्प शिष्यवृत्ती निवासी सराव अभ्यास वर्ग सूरू





**दै . लोकनेता न्युज नेटवर्क**

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर (प्रतिनिधी) येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने, मौजे पाळज येथे पाच दिवसीय ''संकल्प शिष्यवृत्ती निवासी सराव अभ्यास वर्ग सूरू करण्यात आले असुन त्याचे उद्घाटन,काल (दि.२७ जाने) जिल्हा शिक्षणाधिकारी सौ.सविता बिरगे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.ङ्गङ्गआगामी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संकल्पना अधिक स्पष्ट होऊन त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता यावी, यासाठी त्यांची तयारी अधिक प्रभावी आणि परिणामकारक व्हावी या उद्देशाने तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांच्या संकल्पनेतून दि.२७ जाने ते ०१ फेब्रु २०२५ या पाच दिवसाच्या कालावधीत मौजे पाळज येथील गणपती मंदीर परिसरात,पाच दिवसीय ''संकल्प शिष्यवृत्ती निवासी सराव अभ्यास वर्ग सूरू करण्यात आला आहे.ङ्गङ्गमागील सहा महिन्यापासून सातत्याने तालुक्यातील १२४ जिल्हापरिषद शाळेत शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेची जोमाने तयारी करून घेण्यात आली असुन शाळा स्तरावर परीक्षा घेऊन या परीक्षेत गुणानुक्रमे टॉप आलेल्या विद्यार्थ्यांची केंद्र स्तरावर चाचणी घेण्यात आली आणि केंद्र स्तरावर अनुक्रमे टॉप आलेल्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरावर परीक्षा घेण्यात आली.यातील इयत्ता ५वी व ८वी वर्गाच्या च्या एकूण ५४ गुणवंत विद्यार्थ्यांसाठी हा परीक्षा पूर्व सराव वर्ग सुरू करण्यात आला आहे.ङ्गङ्गशिष्यवृत्ती परीक्षेच्या अभ्यासक्रमास अनुसरुन अध्यापन, अध्ययन , प्रश्नपत्रिका सोडवुन घेणे.पुन्हा त्या त्या विषयाच्या तज्ञांकडून मार्गदर्शन, शंका निरसन सत्र , आणि योगा असा नित्यक्रम येथे सूरु झाला आहे.या सराव वर्गाच्या पहिल्या दिवशी जिल्हा ङ्गशिक्षणाधिकारी सविता बिरगे यांनी भेट देऊन अभ्यास वर्गाचे उद्घाटन केले.यावेळीत्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच या उपक्रमाची प्रशंशा करून समाधान व्यक्त केले. श्रीक्षेत्र पाळज गणपती मंदीर ट्रस्टकडून या शिबिरासाठी विशेष मदत केली जात असून गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांच्या मार्गदर्शाखाली शिबिर प्रमुख म्हणून विस्तार आधिकारी सुमन गोणारकर,प्र.शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मण सुरकार हे काम पहात आहेत. जि प हा पाळज चे मुख्याध्यापक पत्तेवार प्र. शिक्षण विस्तार अधिकारी वी. रा.शिंदे, जकियोद्दिन शेख, श्री नंदेवाड, श्री नरसिंग जिद्देवार,सर्व केंद्रप्रमुख,केंद्रीय मुख्याध्यापक,कार्यालयीन समग्र कर्मचारी तसेच तज्ञ शिक्षकबांधव, व आराध्या पब्लिक स्कूलचे संचालक गंगाधर गिरी व समास्त गावकरी या संकल्प सराव वर्गाच्या यशस्वितेसाठी कठोर मेहनत घेत आहेत. पालकांकडून यास उदंड प्रतिसाद मिळाला आहे...

## लोहा शहरात मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी परिवाराच्या वतीने आयोजित हळदी कुंकुंवाच्या कार्यक्रमाला महिलांचा प्रतिसाद



**लोकनेता न्युज नेटवर्क**

**लोहा /विशाल घंटे**

लोहा शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही लोहा न.पा.चे लोकनियुक्त मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या परिवाराच्या वतीने मा . नगरसेविका सौ. गोदावरीताई गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने आयोजित मकर संक्रांती निमित हळदी कुंकुवाच्या कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे.

यावेळी मा.नगरसेविका सौ. गोदावरीताई गजानन सुर्यवंशी यांनी मकर संक्रांती निमित्त आयोजित हळदी कुंकुंवाच्या कार्यक्रमाला येणाऱ्या लोहा शहरातील महिलांच्या हातावर मेहंदी काढली त्यांना कुंकू लावले तसेच सर्व महिलांना मसाला दुध पिण्याचे आयोजन केले. यावेळी सौ. विजयमाला धनराज सुर्यवंशी ,सौ.सीमा लक्ष्मिकांत सुर्यवंशी, सौ.सुप्रिया सचिन सुर्यवंशी,सौ. रिना अमोल व्यवहारे , यांच्यासहित सुर्यवंशी मित्रपरिवार लोहा शहरातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जि.प. प्रा शाळा रिठा येथे माता पालक मेळावा हाळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न




**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**भोकर/माधव नागलवाड**

मकरसंक्रांती व प्रजासताक दिनाच्या निमित्ताने जि.प.प्रा.शाळेत माता पालक व हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला कार्यक्रमास अध्यक्ष श्री माजी गटशिक्षणाधिकारी तथा सरपंच .रमेश संगपवाड सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सविता बाचेवाड, पत्रकार परमेश्वर कोंरटलू,शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष किशन म्हैसनवाड तसेंच सविता नागलवाड, अनिता कोरंटलू, लता तेलंगे, श्रुती कोरंटलू, करिष्मा करंडेकर कांता संगपवाड, अश्विनी बाचेवाड, सावित्रा कुंभरवाड, कल्पना इंदरवाड, आरती करंडेकर, चंद्रकला बाचेवाड हे होते. मान्यवरांकडून प्रतिमेचे पूजन करून हाळदी कुंकवाचा कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली व गावातील महिलांसाठी विवीध प्रकारच्या स्पर्धा घेवून प्रथम,द्वितीय क्रमांक काढून त्याना बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमासाठी गावातील असंख्य महिलांनी सहभाग नोंदवला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रभावती कमटलंवाड, सविता पाध्ये,ज्योती सोनटक्के,पंचफुला शटलवाड,माया सावते,संघमित्रा पोपलवार,श्रीकांत मुकनवार,प्रल्हाद चव्हाण, दिगांबर हापसे आदी जण परिश्रम घेतले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904